# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक ३२५-२२** **दिनांक ०४/११/२०२२**

## ए.टी.एम. कार्डची अदलाबदली करुन फसवणुक करणा-या सराईत आरोपीतास अटक - गुन्हे शाखा, कक्ष 3 विरार यांची कामगिरी.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात गेल्या काही महिन्यापासुन ए.टी.एम. मशीन मधुन पैसे काढुन देण्यासाठी मदतीचा बहाणा करुन हातचलाखीने ए.टी.एम. कार्डची अदलाबदली करुन पैसे काढून फसवणुक झालेल्या गुन्हयांच्या प्रमाणात वाढ झाल्याने सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभीर्याने दखल घेवुन आरोपीताचा शोध घेणेबाबत सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने गुन्हे शाखा, कक्ष ३ विरार शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांचेकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीत नामे मोहम्मद आरीफअली शेख, वय ४८ वर्षे, रा. शक्कर मोहल्ला, नालासोपारा (पश्चिम) यास दिनांक ०१/०२/२०२२ रोजी ताब्यात घेवुन त्याच्याकडे चौकशी केली असता त्याच्या  कब्जात विविध बॅकेची २१ ए.टी.एम. कार्ड व  मोटारसायकल असा एकुण ६५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळून आल्याने तो हस्तगत करण्यात आला.

नमुद आरोपी याचेकडे मिळुन आलेल्या विविध बँकेच्या ए.टी.एम. कार्डच्या पडताळणीवरुन त्याने खालीलप्रमाणे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असून त्यास पुढील कार्यवाहीकरीता तुळींज पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आलेले आहे. उर्वरित ए.टी.एम.कार्डविषयी अधिक तपास सुरु आहे.

**उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणेः-**

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर व कलम |
|---|---|---|
| १. | तुळींज पोलीस ठाणे. | गु.रजि.क्र.६६८/२०२२, भा.द.वि.सं. कलम ४२०. |
| २. | आचोळे पोलीस ठाणे. | गु.रजि.क्र.२०२/२०२२, भा.द.वि.सं. कलम ४२०. |
| ३. | विरार पोलीस ठाणे. | गु.रजि.क्र.९९७/२०२२, भा.द.वि.सं. कलम ४२०. |
| ४. | काशिमिरा पोलीस ठाणे. | गु.रजि.क्र.७६४/२०२२, भा.द.वि.सं. कलम ४२०. |
| ५. | एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे.(बृहन्मुंबई शहर) | गु.रजि.क्र.११४०/२०२२, भा.द.वि.सं. कलम ४२०. |
| ६. | अंबोली पोलीस ठाणे. (बृहन्मुंबई शहर) | गु.रजि.क्र.१०६५/२०२२,भा.द.वि.सं. कलम ४२०. |

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) अति. कार्यभार पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष ३ चे पो.नि. श्री. प्रमोद बडाख, पो.उप.निरी. शिवाजी खाडे, पो.हवा. अशोक पाटील, मुकेश तटकरे, सागर बारवकर, सचित घेरे, पो.अं. अश्विन पाटील, म.सु.ब. प्रविण वानखेडे यांनी पार केलेली आहे.



-------ooooo-------